# प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, रायगड

प/१

जा.क्र.कृसंके/ठेका / १४०० /२०२३ दिनांक – ७/७/२०२३

## निविदा सुचना: (Tender Notice)

भात पैदास विभाग, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, रायगड येथील मुलभुत बिजगुनन केंद्राच्या प्रक्षेत्रावरील विविध भात जातीचे मुलभुत, पैदासकार व पायाभुत बिजोत्पादन कार्यक्रमाचे विविध खालील नमुद केल्याप्रमाणे कामे ठेका पद्धतीने करायचे आहेत. सदरची कामे ठेका पद्धतीने करण्याकरीता विविध ठेकेदारांकडून दरपत्रके मागविणेत येत आहेत. इच्छुक ठेकेदारांनी खालील स्वाक्षरी करणाऱ्याच्या नावे आपले दरपत्रक सिलबंद लखोटयातून **दिनांक: २१/०७/२०२३** रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत या कार्यालयात सादर करावे.

| कालावधी | कामाची यादी | लागणारे एकुण मनुष्यबळ | ठेक्याची रक्कम (रू.) |
|---|---|---|---|
| २५ जुलै २०२३ ते ३१ ऑगस्ट २०२३ | १) भात बिजोत्पादनाची लावणी करणे (कर्जत–२–४०गुंठे, कर्जत–३–५०गुंठे, कर्जत–४–५०गुंठे, कर्जत–५–२१गुंठे, कर्जत–६–२०गुंठे, कर्जत–८–३०गुंठे, कर्जत–९–५०गुंठे, कर्जत–१०–१०गुंठे,कर्जत कोलम–१०गुंठे, कर्जत शताब्दी–१०गुंठे, कर्जत १८४–२०गुंठे, R लाईन्स–१५गुंठे, सहयाद्री–१५०गुंठे व इतर प्रयोग. एकुण क्षेत्र ४७६ गुंठे )<br>२) बांधाच्या खांडी भरणे.<br>३) भात संग्रहालयाची पेरणी करणे.<br>४) भात रोपवाटीकेतील खेकड्यांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी औषध टाकणे<br>५) भात रोपवाटीकेस खते देणे<br>६) भात लावणीसाठी प्लॉट तयार करणे.<br>७) प्लॉटच्या मेरा काढणे, खते टाकणे, लेआऊट करणे<br>८) भात बिजोत्पादनाची रोपे काढून लावणी करणे.<br>९) सर्व प्लॉटचे पाणी व्यवस्थापण करणे<br>१०) बांधावर तणनाशक फवारणी करणे.<br>११) भात रोपवाटीकेस युरीया खते देणे. | २०० मजूर युनिट | ६०,०००/– |
| | **एकुण रक्कम रू. साठ हजार मात्र** | | ६०,०००/– |

कामासबंधीच्या अटी व शर्ती सोबत देण्यात आलेल्या आहेत.

जा.क्र.कृसंके/ कंत्राटी कामे/ १४००/२०२३

प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत जि. रायगड.

पिन कोड – ४१० २०१

दिनांक – 7 JUL 2023

**सहयोगी संशोधन संचालक,**
**प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,**
**कर्जत जि. रायगड.**

प्रत – प्रसिध्दीसाठी रवाना –

१. कार्यालय नोटीस बोर्ड, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत (रायगड).
२. मा.मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, कर्जत, जि. रायगड यांना माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी.
३. मा. तहसिलदार, तहसिल कार्यालय, कर्जत, जि. रायगड यांना माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी.
४. मा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, कर्जत, जि. रायगड यांना माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी.
५. विद्यापिठ वेबसाईट. www.dbskkv.org

H:\RESHMA D\Paradhi sir\Labour file\Labour Kh-2023 new\Labour File July & August 23 For NSM WORK.docx

५/३

## संमती पत्रक

मी खाली सही करणार श्री/श्रीमती.............................................................................. रा. ....... ....................................... लिहून देतो/देते की प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, जि. रायगड अंतर्गत भात पैदास विभागाच्या प्रक्षेत्रावर दरपत्रकात नमूद केलेली कामे करण्यास मी तयार असून या बाबतच्या खालील अटी आणि शर्ती मला मान्य आहेत.

१) प्रक्षेत्रावरील शेती विषयक कामे संबधीत विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख विभागाच्या आवश्यकतेनुसार नेमून देतील त्याप्रमाणे करणे आवश्यक राहील.

२) कामाच्या देयकाची आदायगी महिना पूर्ण झाल्यावर केली जाईल. त्यासाठी देयक सादर करतेवेळी विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांचे काम वेळेत पूर्ण केलेबाबतच्या दाखला जोडणे आवश्यक आहे.

३) निविष्ठांचा पुरवठा या विभागामार्फत केला जाईल.

४) ठेकेदाराकडे स्वतःचे पॅन कार्ड व बॅंक खाते असणे आवश्यक आहे. तसेच ठेकेदाराने कामगारांना कामाचे वेतन व त्याअनुष्यंगीक रक्कम संबधीत कामगारांच्या बॅंक खाती जमा करणे आवश्यक आहे.

५) ठेकेदाराने नेमलेल्या मजूरांना शासनाच्या किमान वेतन दरानुसार किमान वेतन दिले जाते असे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

६) ठेक्यामध्ये असलेल्या मजूरांव्यतिरिक्त प्रक्षेत्रावर गरजेनुसार जादा मजूर विहित कार्यपध्दती अवलंबून नेमण्याचा अधिकार संबधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना राहील.

७) ठेक्यातील मजूरांची किमान व कमाल वयोमर्यादा शासन निर्णयानुसार निश्चीत केलेली असावी.

८) याचिका क्र.१५९१/२०१८ संदर्भात मा.उच्च न्यायालय मुंबई यांच्या दिनांक १८ एप्रिल, २०१८ च्या निर्णयानुसार अंतरिम स्थगितीस अनुसरून परिच्छेद क्र.५१ (ई) नुसार याचिकाकर्त्या मजूरांना ठेकेदाराने ठेक्यामध्ये सामावून घेणे आवश्यक आहे.

९) ठेकेदारामार्फत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठ प्रशासनावर राहणार नाही.

१०) ठेकेदार व्यक्तीस/संस्थेस उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

११) ठेक्यासंबधी इतर सर्व अधिकार विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना/विद्यापीठ प्रशासनाला राहतील.

१२) कामाची वेळ सकाळी ८.०० ते १२.३० आणि दुपारी २.०० ते ५.३० अशी राहील.

१३) ज्या दिवशी ठेकेदार गैरहजर राहणार त्यावेळी पुर्व सुचना देणे बंधनकारक राहील.

१४) प्रक्षेत्रावरील कामे संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सुचनेनुसार करावयाची आहेत.

१५) कामाची गरज संपल्यावर कोणत्याही प्रकारची लेखी पूर्वसुचना न देता ठेका पध्दत रद्द केली जाईल.

१६) प्रक्षेत्रावर काम करत असतांना कोणत्याही कारणाने व कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास सदरील अपघातास हे केंद्र जबाबदार राहणार नाही.

वरील अ.क्र. १ ते १६ मध्ये नमुद केलेल्या अटी व शर्ती मला मान्य आहेत. सदर करारनामा मी स्वखुशीने व कोणतेही दडपण न घेता लिहून देत आहे.

दि.

ठिकाण:

साक्षीदार

सही, नाव व पत्ता

१.........................................................

२.........................................................

............................................................

............................................................

H:\RESHMA D\Paradhi sir\Labour file\Labour Kh-2023 new\Labour File July & August 23 For NSM WORK.docx

जा.क्र. प्राकृसंकें/ भापैवि / /1400/२०२३
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत, जि. रायगड
दिनांक : [illegible]7 JUL 2023

प्रति,
**मा. विस्तार शिक्षण संचालक,**
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली, जि. रत्नागिरी.

**विषय : विद्यापीठ संकेतस्थळावर जाहीरातीस/दरपत्रक प्रसिध्दी देणेबाबत.....**

महोदय ,
सोबत जोडलेल्या दरपत्रकास/जाहीरातीस विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्दी मिळणेकरीता सविनय सादर.
धन्यवाद.

सोबत: वरीलप्रमाणे

आपला विश्वासू,

सहयोगी संशोधन संचालक
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत, जि. रायगड.